जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

दैनिक | वर्ष १ | अंक २०८ | शनिवार, २१ फेब्रुवारी २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210

BLUEVORA
WITH ADDED MINERALS
Pure, Clean & Natural
PACKAGED DRINKING WATER

संक्षिप्त

### लोणी काळभोरमध्ये दहावीच्या परीक्षेला सुरुवात

**लोणी काळभोर, ता. २० :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ आयोजित इयत्ता दहावीच्या लेखी परीक्षेला शुक्रवारी (ता. २०) उत्साहात सुरुवात झाली. लोणी काळभोर (ता. हवेली) येथील पृथ्वीराज कपूर मेमोरिअल हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज या परीक्षा केंद्रावर विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. त्यामुळे परीक्षा केंद्र परिसरात सकारात्मक आणि आनंददायी वातावरण निर्माण झाले होते. या केंद्रावर एकूण ५१२ विद्यार्थी परीक्षेसाठी उपस्थित असल्याची माहिती केंद्रसंचालक अन्सार पिरजादे यांनी दिली. प्राचार्य सीताराम गवळी, सहाय्यक केंद्रसंचालक पांडुरंग पाटील, शशिकांत शेंडगे तसेच पालक व मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांना शुभेच्छा देतानाच परीक्षेचे नियम पाळण्याच्या सूचना देखील देण्यात आल्या. या केंद्रावर पृथ्वीराज कपूर मेमोरिअल हायस्कूल, कन्या प्रशाला, इंग्लिश मिडियम स्कूल लोणी काळभोर तसेच सेंट टेरेसा विद्यालयातील विद्यार्थी परीक्षा देत आहेत.

# लोणी काळभोर गावात शिवजन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा

## ॲड. श्रीयश राहुल काळभोर यांच्या जय भवानी ग्रुपचे कार्य कौतुकास्पद : प्रशांत काळभोर

**लोणी काळभोर, ता. २० :** महाराष्ट्राचे आराध्य दैवत आणि हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचे आचार-विचार, पराक्रम आणि राष्ट्रधर्माची शिकवण सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य जय भवानी ग्रुप मागील सहा वर्षांपासून अविरतपणे करत आहे. शिवजयंतीच्या निमित्ताने समाजप्रबोधन, युवकांमध्ये इतिहासाबद्दल अभिमान जागविणे आणि सामाजिक सलोखा दृढ करण्यासाठी ॲड. श्रीयश राहुल काळभोर व त्यांच्या सहकाऱ्यांनी राबविलेले उपक्रम खरोखरच कौतुकास्पद आहेत, असे प्रतिपादन पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक प्रशांत दादा काळभोर यांनी केले.

लोणी काळभोर (ता. हवेली) येथील पाषाणकर बागेजवळ गुरुवारी (ता. १९) जय भवानी ग्रुपच्या वतीने शिवजन्मोत्सवाचा भव्य आणि उत्साहपूर्ण सोहळा पार पडला.



शिवजन्मोत्सवाच्या निमित्त परिसर भगव्या पताकांनी सजला होता. ढोल-ताशांच्या गजरात आणि जय भवानी, जय शिवाजीच्या घोषणांनी वातावरण दुमदुमून गेले होते. विविध मान्यवरांच्या उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी वरील प्रतिपादन प्रशांत काळभोर यांनी केले आहे.

यावेळी जिल्हा परिषदेच्या सदस्य शीतल कांबळे, महाराष्ट्र केसरी राहुल काळभोर, साधना सहकारी बँकेच्या अध्यक्ष वंदना काळभोर, जिल्हा नियोजन समितीचे सदस्य प्रवीण काळभोर, लोणी काळभोरचे सरपंच नागेश काळभोर, माजी सरपंच राजाराम काळभोर, राहुल काळभोर, वंदना काळभोर कदमवाकवस्तीचे माजी सरपंच नंदू काळभोर, सुभाष अप्पा काळभोर, माजी जिल्हा परिषद सदस्य संजय गायकवाड, हेमंत गायकवाड, आण्णासाहेब काळभोर विराज काळभोर, बाळासाहेब जयवंत काळभोर, सीताराम लांडगे, युवराज काळभोर, प्रताप बोरकर, हेमंत हाडके, गुरुदेव काळभोर आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना प्रशांत काळभोर म्हणाले की, आजच्या पिढीला शिवरायांचा इतिहास केवळ पुस्तकापुरता मर्यादित न राहता त्यांच्या विचारांची प्रेरणा कृतीत उतरली पाहिजे. स्वराज्य, शौर्य, न्यायनिष्ठा आणि स्त्रीसन्मान या मूल्यांची जपणूक प्रत्येकाने केली तरच शिवजयंती साजरी करण्यामागील खरा हेतू साध्य होईल. जय भवानी ग्रुपने गेल्या सहा वर्षांत केवळ उत्सव साजरा न करता समाजप्रबोधनाची चळवळ उभी केली आहे, ही अभिमानास्पद बाब आहे.

ॲड. श्रीयश राहुल काळभोर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी समाजातील सर्व घटकांना एकत्र आणत हा उत्सव सामाजिक सलोखा जपत साजरा केला. कोणताही भेदभाव न ठेवता सर्व समाजघटकांचा सहभाग निश्चित करण्यात आला होता. त्यामुळे हा कार्यक्रम केवळ उत्सव न राहता सामाजिक एकात्मतेचा संदेश देणारा आहे. असे प्रशांत काळभोर यांनी सांगितले.

### गांधी यांच्या गाण्यांनी शिवभक्तांची मने जिंकली

महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध गायक व संगीतकार अवधूत गांधी यांच्या दमदार आवाजाने आणि जोशपूर्ण सादरीकरणाने शिवभक्तांची मने जिंकली. त्यांच्या लाईव्ह संगीत कार्यक्रमाला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. अवधूत गांधी यांनी शेर शिवराज, फत्तेशिकस्त, सुबेदार आणि पावनखिंड या ऐतिहासिक चित्रपटांना संगीत दिले असून, त्यांच्या गीत-संगीतातून शिवकालीन पराक्रम आणि स्वराज्याची प्रेरणा प्रभावीपणे उमटते. कार्यक्रमात त्यांनी या चित्रपटांतील गाजलेली गीते तसेच शिवरायांच्या पराक्रमावर आधारित रचना सादर केल्या. त्यांच्या प्रत्येक गाण्याला प्रेक्षकांकडून टाळ्यांचा कडकडाट आणि जय भवानी, जय शिवाजीच्या घोषणांनी प्रतिसाद मिळाला. जोशपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमाने उपस्थित शिवभक्तांना स्वराज्याच्या इतिहासाची आणि शौर्याची पुन्हा एकदा आठवण करून दिली.

> सामाजिक उपक्रम, गरजूंना मदत, तसेच नागरिकांच्या समस्या प्रशासनापर्यंत पोहोचवण्याचे काम सातत्याने सुरू ठेवले आहे. यामध्ये कोणताही पक्ष किंवा भेदभाव न करता सर्वसामान्यांच्या पाठीशी उभे राहणे हीच भूमिका असणार आहे. नागरिकांच्या अडचणी सोडवण्यासाठी आपण नेहमीच निपक्षपणे काम केले असून भविष्यातही हे कार्य अधिक जोमाने सुरू ठेवणार आहे.
> - **ॲड. श्रीयश काळभोर,** आयोजक

### बारामतीत अतिरिक्त जिल्हाधिकारी पदास राज्य सरकारची मंजुरी

**पुणे, ता. २० :** जिल्ह्यात वाढत चाललेल्या प्रशासकीय कामकाजाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने बारामती येथे अतिरिक्त जिल्हाधिकारी पद निर्माण करण्यास मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे बारामतीसह परिसरातील महसुली आणि इतर प्रशासकीय कामांना गती मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

पुणे जिल्ह्याची वाढती लोकसंख्या, औद्योगिक विस्तार आणि विविध विकास प्रकल्पांमुळे कामाचा व्याप लक्षणीय वाढला आहे. विशेषतः बारामती, इंदापूर आणि दौंड या तालुक्यांमध्ये प्रशासकीय प्रकरणांची संख्या वाढत असल्याने स्थानिक पातळीवर स्वतंत्र अतिरिक्त जिल्हाधिकारी नेमण्याची मागणी सातत्याने केली जात होती. त्यानुसार शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला होता. सरकारने अखेर या प्रस्तावाला मंजुरी देत बारामती येथे अतिरिक्त जिल्हाधिकारी पद निर्माण करण्यास हिरवा कंदील दिला आहे. नव्या कार्यालयामुळे महसूल विषयक कामे, अपील प्रकरणे, जमीन अधिग्रहण, निवडणूक प्रक्रिया आणि इतर शासकीय कार्यवाही अधिक वेगाने पार पाडता येणार आहे. तसेच नागरिकांना किरकोळ कामांसाठी पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात जाण्याची गरज कमी होणार असल्याचे सांगितले जात आहे.

# नागपूरात चार वर्षीय चिमुकला अंगणवाडीत रात्रभर कोंडला

**नागपूर, ता. २० :** खेळता खेळता शाळेच्या खोलीत जाऊन झोपलेल्या चार वर्षीय मुलाला अनवधानाने रात्रभर शाळेतच कोंडले गेल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. ही घटना खापरखेडा पोलिस स्टेशन हद्दीतील बोरकर लेआउट परिसरात घडली. सुदैवाने सकाळी संबंधित मुलगा सुरक्षित अवस्थेत आढळून आल्याने पोलिसांनी सुटकेचा निश्वास सोडला.

हिमांशू विश्वजित बागडे (वय ४) असे या चिमुकल्याचे नाव आहे. तो घरापासून सुमारे अर्धा किलोमीटर अंतरावरील बालवाडीत शिक्षण घेतो. त्याचे वडील खासगी नोकरीत असून कुटुंबात दोन भाऊ आहेत. संबंधित बालवाडीत दोन खोल्यांमध्ये वर्ग भरतात. बुधवारी दुपारी खेळताना हिमांशू शाळेत गेला. पुढे तो



मागील खोलीत जाऊन थकव्यामुळे झोपला. दरम्यान, सायंकाळी महिला कर्मचाऱ्याने केवळ समोरील खोलीची पाहणी करून शाळेला कुलूप लावले आणि घरी रवाना झाली. मागील खोलीत हिमांशू झोपलेला असल्याचे तिच्या लक्षात आले नाही. सायंकाळी साडेपाच वाजूनही हिमांशू घरी न परतल्याने आईला संशय आला. नातेवाइकांच्या मदतीने शोधमोहीम सुरू करण्यात आली; मात्र त्याचा ठावठिकाणा लागला नाही. अखेर वडिलांनी खापरखेडा पोलिसांत धाव घेत तक्रार दाखल केली. चार वर्षीय मुलगा बेपत्ता झाल्याची माहिती मिळताच पोलिस यंत्रणा सतर्क झाली.

घटनेची माहिती मिळताच पोलिस उपायुक्त डॉ. संदीप पखालेयांनी घटनास्थळी भेट दिली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सात शोधपथके स्थापन करण्यात आली. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले. तसेच खापरखेडा, कोराडी, कामठी, सावनेर आणि नागपूर शहरात शोध मोहीम राबविण्यात आली. अपहरणाचा गुन्हाही दाखल करण्यात आला होता. मात्र कोणताही ठोस सुगावा न लागल्याने डॉ. पखाले यांनी शाळेची सखोल झाडाझडती घेण्याचा निर्णय घेतला. गुरुवारी सकाळी शाळेचे कुलूप उघडून तपासणी करण्यात आली असता मागील खोलीत हिमांशू सुखरूप अवस्थेत आढळला. त्यानंतर पोलिसांसह कुटुंबीयांनीही सुटकेचा निश्वास सोडला. दरम्यान, शाळा किंवा बालवाडी बंद करताना सर्व खोल्यांची काळजीपूर्वक तपासणी करावी, परिसराची पाहणी करावी आणि कोणतीही संशयास्पद बाब आढळल्यास त्वरित पोलिसांना कळवावे, असे आवाहन डॉ. संदीप पखाले यांनी केले आहे.

# आमच्यात जे झालं ते रागाच्या भरात झालं; पौडच्या कुस्तीत राडा झाल्यानंतर सिकंदर शेखची प्रतिक्रिया

**पुणे, ता. २० :** महाराष्ट्रातील नामांकित मल्ल सिकंदर शेख गेल्या काहीदिवसांपासून एका वादग्रस्त सामन्यामुळे चर्चेत आहे. मुळशी तालुक्यातील पौड येथे १७ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्री निमित्त आयोजित मल्लिकार्जुन कुस्ती किताब स्पर्धेत सिकंदर शेख आणि माऊली कोकाटे यांच्यात ११ लाख रुपयांची प्रतिष्ठेची कुस्ती रंगली. सुमारे दीड तास चाललेल्या या सामन्यात दोन्ही मल्लांनी जोरदार झुंज दिली; मात्र अखेर वादाच्या छायेत सामना बरोबरीत सुटला.

सामन्यादरम्यान कोकाटे यांनी सिकंदरला वारंवार कानठाळी दिल्याने वातावरण तापले. सिकंदरने ताकीद दिल्यानंतरही प्रकार थांबला नाही. याच वेळी कोकाटेचा एक समर्थक आखाड्यात उतरून सिकंदरवर धावून आल्याने गोंधळ उडाला.





पंचांनी तातडीने सामना थांबवला. काही वेळाने परिस्थिती नियंत्रणात आल्यानंतर सामना पुन्हा सुरू झाला; परंतु स्पष्ट निकाल लागला नाही आणि दोन्ही मल्लांना विजयी घोषित करण्यात आले.

सिकंदर शेख यांनी माध्यमांशी बोलताना संयत भूमिका घेतली. आमच्यात जे झालं ते रागाच्या भरात झालं. कुस्तीमध्ये शरीर तापलेलं असतं. मला कुणालाही बदनाम करायचं नाही. पण बाहेरून रिंगमध्ये येऊन मारणं चुकीचं आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. त्यांच्या या वक्तव्यामुळे वादाला पूर्णविराम देण्याचा प्रयत्न दिसून आला.

कुस्ती हा महाराष्ट्राच्या परंपरेचा भाग आहे. आखाड्यातील स्पर्धा कितीही तापल्या तरी नियम आणि शिस्त यांना प्राधान्य दिले जाते. बाहेरील व्यक्तीने हस्तक्षेप करणे हे खेळाच्या आत्म्याला बाधा देणारे आहे. सिकंदर शेख शांत आणि तांत्रिकदृष्ट्या परिपक्व मल्ल म्हणून ओळखले जातात, तर माऊली कोकाटे यांचाही ग्रामीण भागात मोठा चाहता वर्ग आहे. या घटनेने आयोजकांच्या सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

प्रतिष्ठेच्या कुस्त्यांमध्ये लाखो रुपयांची बक्षिसे आणि प्रचंड गर्दी असते. त्यामुळे अशा स्पर्धांमध्ये कडक सुरक्षा आणि स्पष्ट नियमांची अंमलबजावणी आवश्यक ठरते. अन्यथा खेळातील रोमांचकता वादात बदलण्याचा धोका कायम राहतो.

# महाविकास आघाडीत राज्यसभा–विधानपरिषद जागांसाठी संघर्ष; काँग्रेसची भूमिका ठरणार निर्णायक

**मुंबई, ता. २० :** राज्यसभेसाठी महाराष्ट्रातून सर्वाधिक ७ जागांसाठी निवडणूक होणार आहे. महाराष्ट्रातील ७ जागांसाठी होणारी ही निवडणूक राजकीयदृष्ट्या महत्त्वाची मानली जात आहे. विधानसभेतील पक्षीय संख्याबळाच्या पार्श्वभूमीवर कोणत्या पक्षाला किती जागा मिळणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. अशातच आता राज्यसभा आणि विधानपरिषदेच्या जागेसाठी महाविकास आघाडीत संघर्षाची ठिणगी पडण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

राज्यसभेसाठी एक जागा महाविकास आघाडीच्या वाट्याला आहे, त्यामुळे या जागेवर पुन्हा ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्याच नावाचा विचार केला जात असल्याची माहिती आहे. पण मविआत सर्धाविक संख्याबळ ठाकरेंच्या शिवसेनेकडे आहे. त्यामुळे दोन्ही जागांवर ठाकरेंच्या शिवसेनेकडून देखील दावा केला जात असल्याचे समजते. असे असले तरी ठाकरेंच्या शिवसेनेकडून शरद पवार यांच्या नावाला राज्यसभेसाठी विरोध नाही. विधानपरिषदेच्या जागेसाठी ठाकरेंच्या शिवसेनेकडून जोर धरला जात आहे. गेल्या काही दिवसांपूर्वीच पत्रकार परिषदेत उद्धवसेनेचे नेते खासदार संजय राऊत यांनी उद्धव ठाकरे यांनी पुन्हा विधानपरिषेची निवडणूक लढवण्याची विनंती करणार असल्याचे सांगितले होते. त्यामुळे उद्धव ठाकरे पुन्हा विधानपरिषदेची निवडणूक लढवणार असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे.

विलिनीकरणावर शरद पवारांच्या पक्षाने भूमिका स्पष्ट करावी असा सूर आवळला जात असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे राज्यसभा आणि विधानपरिषदेसाठी कोणत्या पक्षाकडून कोण उमेदवार द्यायचा यावर मतमतांतरे होण्याची दाट शक्यता आहे.

या सगळ्यात काँग्रेस दुसऱ्या स्थानावर असून आघाडीत १६ आमदार काँग्रेस पक्षाकडे आहेत. राज्यसभेची एक जागा शरद पवार यांच्या राष्ट्रवादीला आणि विधानपरिषदेची जागा उद्धवसेनेच्या वाट्याला गेल्यास काँग्रेसच्या हाती काय येणार असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. त्यामुळे काँग्रेसची भूमिका निर्णायक ठरणार असून, अंतर्गत बैठकीत काय ठरते याकडे लक्ष असणार आहे. निवडणूक आयोगाने ३७ राज्यसभेच्या जागांसाठी निवडणुकीच्या तारखा जाहीर केल्या आहेत. या जागांसाठी १६ मार्चाला निवडणुका होणार आहे. महाराष्ट्रात सर्वाधिक ७ जागा आहेत, त्यानंतर तामिळनाडू (६) आणि पश्चिम बंगाल आणि बिहार (प्रत्येकी ५) आहेत. महाराष्ट्रातील शरद पवार, रामदास आठवले, कनिमोझी, तिरुची शिवा आणि राज्यसभेचे उपसभापती हरिवंश, प्रियांका चतुर्वेदी यांचा कार्यकाळ २ एप्रिल रोजी संपत आहे.

# उरुळी कांचन येथे दहावीच्या विद्यार्थ्यांचे परीक्षा केंद्रावर गुलाब पुष्प देऊन स्वागत

**उरुळी कांचन, ता. २० :** परीक्षा म्हटले की तणावाचे वातावरण असते. या वातावरणाचे आनंदात रूपांतर व्हावे म्हणून पूर्व हवेलीतील उरुळी कांचन येथील महाविद्यालयातील दहावीच्या परीक्षार्थी विद्यार्थ्यांना शुभेच्छांबरोबरच गुलाबाची फुले देऊन स्वागत करण्यात आले.



शालेय जीवनात महत्वाचा टप्पा म्हणून दहावीच्या परीक्षेकडे पाहीले जाते. त्यामुळे पहिला पेपर कसा जाईल, प्रश्नपत्रिकेत नेमके काय विचारले जाईल, सर्व प्रश्न वेळेत सोडवता येतील का. असे विविध प्रश्न विद्यार्थ्यांच्या मनात घर करून राहतात. यातून तणावाची स्थिती उद्भवते. त्यामुळे काही विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर तणाव जाणवतो. हीच काळजी बऱ्याच पालकांनाही असते.

पहिला पेपर असल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साह दिसून येत होता. त्यामुळे ठिकठिकाणच्या परीक्षा केंद्राच्या आवारात शुक्रवारी (ता. २०) पालकांची गर्दीही पाहायला मिळाली. विद्यार्थ्यांनी तणावमुक्त होऊन परीक्षेला सामोरे जावे म्हणून उरुळी कांचन येथील महात्मा गांधी विद्यालयात मुलांना गुलाबाची फुले देऊन त्यांचे शाळेत स्वागत केले.

यावेळी महात्मा गांधी सर्वोदय संघाचे विश्वस्त खजिनदार राजाराम कांचन विश्वस्त महादेवराव कांचन उपप्रमुख विलास काशीद, दहावी विभाग प्रमुख संगीता शिर्के, रवींद्र पानसरे, सुभाष काळे सर्व प्रशासकीय वर्ग अध्यापक अध्यापिका, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

उरुळी कांचन येथील महात्मा गांधी विद्यालय या केंद्रावर महात्मा गांधी विद्यालय उरुळी कांचन, अमर एज्युकेशन इन्स्टिट्यूट कोरेगाव मूळ, लोकनेते दादा जाधवराव विद्यालय हिंगणगाव, न्यू इंग्लीश स्कूल अष्टापुर, पुरोगामी विद्यालय नायगाव, संत यादव बाबा विद्यालय शिंदवणे, शिवराम बापू कुदळे विद्यालय बोरी ऐंदी, सुभाष अण्णा कुल माध्यमिक विद्यालय बोरीभडक, स्वामी विवेकानंद हायस्कूल उरुळी कांचन, विद्या विकास मंदिर यवत, डॉक्टर अस्मिता इंग्लीश मिडीयम स्कूल उरुळी कांचन, मुक्ताई मेमोरियल स्कूल कुंजीरवाडी या विद्यालयातील एकूण ९९६ विद्यार्थी परीक्षेसाठी उपस्थित असल्याची माहिती प्राचार्य भारत भोसले यांनी दिली.

दरम्यान, यावेळी परीक्षादरम्यान कॉपीचे प्रकार होऊ नये म्हणून उरुळी कांचन पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन वांगडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी महात्मा गांधी महाविद्यालयाच्या परिसरात चोख बंदोबस्त ठेवला होता.

## संक्षिप्त



### पुणे मेट्रोच्या विस्ताराला राज्य सरकारचा 'ग्रीन सिग्नल'

**पुणे, ता. २० :** पुणे शहराच्या सार्वजनिक वाहतुकीचा कणा ठरू पाहणाऱ्या पुणे मेट्रोच्या विस्ताराला आता राज्य सरकारने 'ग्रीन सिग्नल' दिला आहे. हडपसर ते खडकवासला आणि माणिकबाग ते नळस्टॉप या दोन महत्त्वाच्या मार्गांना सुधारित प्रशासकीय मान्यता मिळाल्याने पुणेकरांना दिलासा मिळाला आहे. पुण्यातील सिंहगड रस्ता हा सध्या भीषण वाहतूक कोंडीसाठी ओळखला जातो. माणिकबाग ते नळस्टॉप जोडणीमुळे हजारो आयटी कर्मचारी आणि नोकरदारांचा प्रवास केवळ १५-२० मिनिटांवर येईल. दुसरीकडे, हडपसर ते खडकवासला मार्गिकेमुळे पूर्व आणि पश्चिम पुणे एकमेकांशी जोडले जाऊन सोलापूर रस्त्यावरील वाहनांची संख्या लक्षणीयरीत्या कमी होईल. खडकवासला ते हडपसर (मार्गिका क्र. ४): हा मार्ग सुमारे २५.५ किलोमीटरचा असून यावर २२ स्थानकेअसतील. यामुळे धरण परिसर थेट शहराच्या मुख्य भागाशी जोडला जाईल. माणिकबाग ते नळस्टॉप: सिंहगड रस्त्यावरील वाहतुकीचा ताण कमी करण्यासाठी ही ६.१२ किलोमीटरची उपमार्गिका अत्यंत महत्वाची ठरणार आहे. राज्य सरकारच्या मान्यतेनंतर आता महामेट्रो आणि केंद्र सरकारमध्ये सामंजस्य करार होईल. लवकरच निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन कामाला सुरुवात होईल.

### ओतूरमध्ये अज्ञात वाहनाची धडक; ५५ वर्षीय व्यक्तीचा जागीच मृत्यू

**ओतूर, ता. २० :** अहिल्यानगर-कल्याण महामार्गावर ओतूर येथील हॉटेल वायकर्स जवळ अज्ञात वाहनाने दिलेल्या धडकेत एका ५५ वर्षीय व्यक्तीचा जागीच मृत्यू झाल्याची माहिती ओतूर पोलिसांनी दिली आहे. दत्तात्रेय लक्ष्मण अल्हाट (रा. ओतूर, ता. जुन्नर) असे मृत पावलेल्या व्यक्तीचे नाव आहे. ओतूरकडून कल्याणच्या दिशेने जाणाऱ्या अज्ञात वाहनाने त्यांना धडक दिल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, या अपघाताची माहिती मिळताच ओतूर पोलीस ठाण्याच्या कर्मचाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. अपघातग्रस्ताला उपचारासाठी ओतूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले, मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या प्रकरणी अज्ञात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा नोंदवण्याची प्रक्रिया सुरू असून पुढील तपास ओतूर पोलीस करत आहेत. अहिल्यानगर-कल्याण महामार्गावर आळे' ाटा ते ओतूर आणि ओतूर ते पारगाव ' ाटा या दरम्यान अपघातांचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. महामार्गावर पडलेले खड्डे आणि त्यातून वाहने चालवताना चालकांची होणारी कसरत, तसेच महामार्गालगत असलेल्या गावांजवळील गर्दी यामुळे हे अपघात घडत आहेत. भरधाव वेगाने जाणाऱ्या वाहनांवर कोणाचेही नियंत्रण नसल्याने अनेक निरपराध नागरिकांचे बळी जात आहेत.

# आता सरकारी कामे होणार सहा दिवसांत; राज्य सरकारचे महाराजस्व अभियान जाहीर

**पुणे, ता. २० :** छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान जाहीर केले असून, हे अभियान राज्यातील सर्व मंडल तसेच नगरपालिका, नगरपंचायतीच्या क्षेत्रात पुढच्या दोन महिन्यात सहा दिवस घेतले जाणार आहे, अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. विशेष म्हणजे, महसूलमंत्र्यांच्या देखरेखीखाली या अभियानाची राज्यस्तरीय अंमलबजावणी दररोज होणार आहे. यासाठी सर्व जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समित्या नियुक्त करण्यात आल्या आहेत. तसेच महसूलमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली महसूल राज्यमंत्र्यांसह विधान परिषदेचे दहा आमदार राज्यस्तरीय समितीचे सदस्य आहेत. अभियानातील समित्यांना संपूर्ण राज्याचा आढावा, वेळापत्रक, धोरणात्मक निर्णय, प्रलंबित प्रकरणांचा निपटारा, अर्जदारांच्या यादीचे निरीक्षण, डेटा मॉनिटरिंग, जबाबदारी निश्चिती आणि अभियानाचा दर पंधरवड्याला प्रगती अहवाल तपासण्याच्या सूचना दिल्या आहेत.



यासंदर्भातील शासन निर्णय जारी केल्यावर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केल्यानंतर सर्वसामान्य जनता, शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी आणि महिलांसाठी असलेल्या महसूल विभागातील महत्वाच्या १५ स्वरुपातील सेवा एकाच दिवसात मार्गी लावल्या जाणार आहेत.

त्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान (टप्पा-१) राबविण्याचा निर्णय घेतला असून राज्यातील सर्व महसूल मंडल आणि नगर परिषद, नगर पंचायत स्तरावर भव्य शिबिरे भरवली जाणार आहेत.

या अभियानांतर्गत महसूल विभागाने एकूण १५ पेक्षा जास्त प्रमुख सेवा थेट शिबीर स्थळी देण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. प्रलंबित फेरफार, ७/१२मधील चुकांची दुरुस्ती, डिजिटल स्वाक्षरीचे ७/१२ आणि ८-अ उताऱ्यांचे वाटप, उत्पन्न, रहिवासी आणि जातीचे प्रमाणपत्र, नॉन-क्रीमीलेअर प्रमाणपत्र, अकृषिक तरतुदींबाबत मार्गदर्शन व सुधारणा, नवीन व्यवस्थापनानुसार सनद प्रक्रियेची माहिती,

सामाजिकअर्थसहाय्ययोजनांचे लाभ मंजूर करणे, विद्यार्थ्यांसाठी दाखले वाटप, तुकडेबंदी कायद्याच्या उल्लंघनाबाबतच्या प्रकरणांचा निपटारा, पाणंद रस्त्यांच्या प्रशासकीय मान्यतेचे आदेश, घरांसाठी पट्टे वाटप, ई-मोजणी अर्ज, ग्रीस्टॅक आणि पी.एम. किसान नोंदणी, भूसंपादन व अकृषिक परवानगी प्रकरणी कमी-जास्त पत्रके तयार करून गाव दप्तर अद्यावत केली जाणार आहेत.

**अभियानाचे वेळापत्रक**

- मार्च महिन्यातील शिबिरे : ७ मार्च आणि १४ मार्च
- एप्रिल महिन्यातील शिबिरे : १० एप्रिल आणि १७ एप्रिल
- मे महिन्यात नगरपरिषद/ नगरपंचायत स्तरावर शिबिरे : ८ मे आणि १५ मे

### कात्रज डेअरी चौकात अपघात

**कात्रज, ता. २० :** पुण्यातील कात्रज डेअरी चौक परिसरात एक भीषण अपघात झाल्याची घटना घडली आहे. या अपघातात दुचाकीस्वार महिलेचा जागीच मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जुपिटर मोटार मोपेड वरून जात असताना संबंधित महिलेला एमएच १२ वाय क्यू ७२५९ क्रमांकाच्या हायवा डंपरने जोरदार धडक दिली. धडकेनंतर दुचाकीवरील महिला डंपरच्या पाठीमागील टायरखाली आल्याने तिचा जागीच मृत्यू झाला. अपघातात मृत्यू झालेल्या महिलेचे नाव प्ररिमा प्रधान (वय-३८) असून त्या कात्रज कोंढवा रोड येथील श्रीज्वेल सोसायटीमध्ये वास्तव्यास होत्या. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत हायवा डंपर चालकाला ताब्यात घेतले आहे. त्याची वैद्यकीय तपासणी करण्यात येत असून पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे.

# लग्नाच्या आमिषाने पोलीस अधिकाऱ्याचा तरुणीवर वारंवार अत्याचार

**छत्रपती संभाजीनगर, ता. २० :** शहरातून संतापजनक आणि माणुसकीला काळीमा फासणारी घटना उघडकीस आली आहे. मोबाईल हरवल्याची तक्रार देण्यासाठी पोलीस ठाण्यात आलेल्या २३ वर्षीय तरुणीला लग्नाचे आमिष दाखवून, ५८ वर्षीय पोलीस उपनिरीक्षकाने तिच्यावर वर्षभर अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

या प्रकरणी संशयित पोलीस उपनिरीक्षक सुभाष चव्हाण, त्याची पत्नी आणि मुलावर क्रांती चौक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित तरुणी मूळची नांदेडची असून ती पुण्यात एका खाजगी कंपनीत नोकरी करते. ७ मार्च २०२५ रोजी तिचा मोबाईल हरवल्याने ती तक्रार देण्यासाठी छत्रपती संभाजीनगरमधील क्रांती चौक पोलीस ठाण्यात गेली होती. तिथे तिची भेट पीएसआय सुभाष चव्हाण याच्याशी झाली. तक्रार नोंदवण्याच्या बहाण्याने चव्हाणने तिचा नंबर मिळवला आणि 'नंबर कन्फर्म करायचा आहे' असे सांगून तिला फोन करण्यास सुरुवात केली.

हळूहळू त्याने मदतीचा बहाणा करून तरुणीचा विश्वास संपादन केला आणि तिला प्रेमाच्या जाळ्यात ओढले. पीडितेचा आरोप आहे की, चव्हाणने तिला लग्नाचे खोटे आमिष दाखवून शहरातील विविध लॉजवर नेऊन तिच्यावर अत्याचार केले. इतकेच नाही तर, तिला बनावट मंगळसूत्र बांधून 'तू माझी पत्नी आहेस' असे भासवले.

तक्रारीनुसार, ७ मार्च २०२५ ते १८ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत हा अत्याचाराचा सिलसिला सुरू होता. या दरम्यान पीडिता गर्भवती राहिली असता, तिची इच्छा नसतानाही आरोपीने पुणे आणि संभाजीनगर येथे तिचा तीन वेळा गर्भपात घडवून आणला. जेव्हा पीडितेने लग्नासाठी तगादा लावला, तेव्हा आरोपीने तिला जातीवाचक शिवीगाळ करत मारहाण करण्यास सुरुवात केली.

या संपूर्ण प्रकरणाची माहिती आरोपीची पत्नी नर्मदा चव्हाण आणि मुलगा सागर चव्हाण यांना मिळताच, त्यांनीही पीडितेला धमकावण्यास सुरुवात केली. २८ जानेवारी रोजी आरोपीच्या पत्नीने पीडितेला माझ्या पतीचा पाठलाग सोड आणि गर्भपात कर असे म्हणत मारहाण केली. यावेळी झालेल्या झटापटीत आणि मुलाने केलेल्या मारहाणीत पीडितेचा दीड महिन्याचा गर्भपात झाल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, शारीरिक आणि मानसिक छळाची परिसीमा गाठल्यानंतर पीडितेने अखेर हिंमत एकवटून पोलिसांत धाव घेतली. या गंभीर तक्रारीची दखल घेत पोलिसांनी पीएसआय सुभाष चव्हाण, त्याची पत्नी आणि मुलावर विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. या घटनेमुळे पोलीस दलात मोठी खळबळ उडाली असून, वरिष्ठ पोलीस अधिकारी या प्रकरणाचा सखोल तपास करत आहेत.

## केदारेश्वर मंदिरात धाडसी चोरी महाराजांच्या चांदीच्या पादुका लंपास

**कोरेगाव, ता. २० :** चोरट्याने दानपेटीतील रोकडसह सद्गुरु परमपूज्य रमणगिरी महाराज यांच्या चांदीपत्रित सागवान लाकडी पादुका चोरून नेल्याची माहिती समोर आली आहे. गुरुवारी पहाटे नित्यपूजेसाठी आलेल्या भाविकांना श्री केदारेश्वर मंदिर आणि श्री दत्त मंदिरातील दानपेट्या फोडलेल्या दिसल्या.

देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष राजेंद्रबुवा बर्गे यांना माहिती देण्यात आली. त्यानंतर विश्वस्त, पदाधिकारी व नागरिकांनी मंदिर परिसरात गर्दी केली. मंदिर व्यवस्थापक संभाजी कुंडलिक पडवळ हे मंदिराच्या आवारातील कार्यालयात झोपले असताना त्यांच्या खोलीला बाहेरून कडी लावण्यात आल्याचे आढळले. साडेबारा वाजण्याच्या सुमारास एक व्यक्ती मंदिरात आल्याची माहितीही समोर आली आहे. अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक घनश्याम बल्लाळ घटनास्थळी दाखल झाले. फॉरेन्सिक पथक, श्वान पथक व ठसे तज्ज्ञांना पाचारण करण्यात आले. श्वान पथक मंदिर परिसरातच घुटमळत राहिल्याने स्थानिक माहितीगाराचा सहभाग असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. पोलिस बंदोबस्तावर प्रश्नचिन्ह? कोरेगाव शहर व परिसराची लोकसंख्या सुमारे ४० हजारांच्या घरात असताना बुधवारी रात्री रात्रवस्तीसाठी केवळ एक महिला पोलीस अधिकारी, एक वाहनचालक, एक महिला पोलीस हवालदार व एक अंमलदार अशी चार जणांचीच नेमणूक करण्यात आल्याची माहिती आहे. पोलीस ठाण्यातील ड्युटी बटवड्यावरून अंतर्गत धुसफुस बऱ्याच महिन्यांपासून सुरू असल्याचे बोलले जात असून त्याचा परिणाम शहराच्या सुरक्षिततेवर होत असल्याची नागरिकांची भावना आहे.

# जिल्हा परिषद शाळांचा डंका; गुणवत्ता मूल्यांकनात पुणे जिल्ह्यातील ८१ शाळा अव्वल

**पुणे, ता. २० :** राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या वतीने शाळा गुणवत्ता मूल्यांकन व आश्वासन आराखड्याची (एसक्युएएफ) निर्मिती करण्यात आलेली आहे. त्याअंतर्गतच्या बाह्य मूल्यांकनात पुणे जिल्ह्यातील ८१ शाळांना ए प्लस श्रेणी प्राप्त झाली असून त्यात पुणे जिल्हा परिषदेच्या तब्बल २८ शाळांचा समावेश असून हे उल्लेखनीय यश ठरले आहे.

राज्यातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनाच्या सर्व शाळांचे मूल्यांकन करण्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद येथे राज्य शाळा मानक प्राधिकरण कक्षाची स्थापना करण्यात आली. शाळांना स्वयं-मूल्यांकनासाठी लिंक उपलब्ध करून देण्यात आली होती.



सन २०२४-२५ मध्ये राज्यातील १ लाख २ हजार ६७५ शाळांनी स्वयं मूल्यांकन पूर्ण केले.

सन २०२४-२५ मध्ये स्वयं मूल्यांकनात सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या शाळांच्या पैकी सन २०२५-२६ मध्ये १० हजार ७१२ शाळांची बाह्य मूल्यांकन करण्यासाठी निवड करण्यात आली. त्यापैकी १० हजार ६४४ शाळांचे बाह्य मूल्यांकन पूर्ण करण्यात आले. बाह्य मूल्यांकनानंतर त्रयस्थांद्वारे शाळांचे मुल्यांकन करण्यात आले. यात ४२९ शाळांना ए प्लस श्रेणी प्राप्त झाली आहे.

पुणे जिल्ह्यातील एकूण ७१२ शाळांचे बाह्य मुल्यांकन पूर्ण करण्यात आले असून, त्यापैकी ८१ शाळाना ए प्लस श्रेणी प्रदान करण्यात आली आहे. या यशात पुणे जिल्हा परिषदेच्या शाळांचा ए प्लस श्रेणीत समावेश आहे. यात आंबेगाव ४, बारामती २, भोर ३, हवेली १, जुन्नर २, खेड ८, मावळ २, मुळशी- १, पुरंदर- ३. शिरुर- २याप्रमाणे तालुकानिहाय शाळांचा समावेश आहे.

> भविष्यात पुणे जिल्ह्यातील सर्व शाळांनी गुणवत्तावाढीसाठी प्रयत्नशील राहून अधिकाधिक शाळांनी ए प्लस श्रेणी प्राप्त करावी. पुणे जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे जिल्ह्यातील शैक्षणिक गुणवत्ता अधिक बळकट होत असून, विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देण्याच्या दिशेने महत्वपूर्ण पाऊल पडले आहे.
> - **गजानन पाटील,** मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे जिल्हा परिषद

पुणे जिल्ह्यातील जिल्हा परिषद, खाजगी अनुदानित व स्वयं-अर्थसहाय्यित अशा सर्व प्रकारच्या शाळांचा मुल्यांकनात सहभाग होता. स्वयंमूल्यांकनानंतर ए प्लस श्रेणीस पात्र ठरलेल्या शाळाचे बाह्य मूल्यांकन करण्यात आले. यासाठी विशेष समित्यांनी शाळांना भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली.

शाळांची शैक्षणिक गुणवत्ता, विद्यार्थ्यांना उपलब्ध सुविधा, पायाभूत सुविधा, कुशल मनुष्यबळ या निकषावर शाळांची तपासणी करण्यात आली. निकषांनुसार माहिती नोंदवून पुराव्यासह अहवाल सादर करुन शाळांना श्रेणी देण्यात आली आहे.

## मेलेल्या माणसाने विकला ११ कोटींचा प्लॉट?; जमीन घोटाळ्याचा पर्दाफाश

**पुणे, ता. २० :** आगाखान पॅलेससमोरील कोट्यवधी किमतीच्या प्लॉटवर मृत व्यक्तीच्या नावाने बनावट कागदपत्रे तयार करून खरेदी-विक्री व गहाणखत केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी दिल्ली येथील व्यावसायिक अभिनव कोतरू यांनी येरवडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

तक्रारीनुसार येरवडा येथील आगाखान पॅलेससमोर, सुमारे ११ हजार ६०० चौरस फुटांचा प्लॉट आहे. हा प्लॉट दिवंगत ब्रिज किशन कोतरू यांनी १९७२ साली खरेदी केला होता. त्यांचे २१ ऑगस्ट २०१२ रोजी निधन झाले. न्यायालयीन आदेशानंतर २०२२ मध्ये कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळाले व २०२५मध्ये नगर भूमापन कार्यालयात फेरफार नोंदही वारसांच्या नावावर झाली.

मात्र, ७ फेब्रुवारी २०२६ रोजी प्लॉटवरील वॉचमनला काही व्यक्तींनी प्लॉट आम्ही खरेदी केला असल्याचे सांगून जागा रिकामी करण्यास सांगितल्याने प्रकार उघड झाला. तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार, संबंधित व्यक्तीने स्वतःला एस.के. अॅग्रो कंपनीचा सीएमडी असल्याचे सांगत डिसेंबर २०२४ मध्ये ब्रीज किशन कोतरू यांच्याकडून प्लॉट खरेदी केल्याचा दावा केला.

विशेष म्हणजे, ब्रीज किशन कोतरू यांचे निधन २०१२ मध्ये झालेले असताना ३ व ४ डिसेंबर २०२४ रोजी दुय्यम निबंधक, हवेली क्र. १९, औंध येथे ग्रीमेंट टू सेल, सेलडीड व गहाणखत नोंदवण्यात आल्याचा आरोप आहे. तक्रारीत नमूद केल्याप्रमाणे, अज्ञात तोतया व्यक्तीला ब्रीज किशन कोतरू म्हणून उभे करून, दोन साक्षीदारांच्या मदतीने आणि एस.के. अॅग्रोफुड टेक प्रा. लि. कंपनीच्या प्रतिनिधीच्या सहभागाने हे बनावट दस्त तयार करण्यात आले. या व्यवहाराच्या आधारे बँक कर्ज प्रक्रियाही सुरू केल्याचे समोर आले आहे. दरम्यान, काही व्यक्तींनी ११ कोटी रुपयांत प्लॉट खरेदीचा व्यवहार झाल्याचा दावा करीत स्टॅम्प ड्युटीवर ७० -८० लाख रुपये भरल्याची माहिती तक्रारदारांना मिळाली.

वारसांच्या म्हणण्यानुसार, कोटींच्या मालमत्तेवर बेकायदेशीर ताबा मिळवण्यासाठी संगनमताने फसवणूक करण्यात आली आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक अंजुम बागवान यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू असून, बनावट कागदपत्रे तयार करणारे, साक्षीदार व संबंधित कंपनी प्रतिनिधी यांच्याविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## सहकारी बँकेत निघाले चक्क ९१ लाखांचे सोने निघाले चक्क बनावट

**पुणे, ता. २० :** शहरातील एका बहुराज्य सहकारी बँकेच्या दोन शाखांमध्ये तब्बल ९१ लाख रुपयांच्या बनावट सोनेतारण कर्ज घोटाळ्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. ४१ कर्ज प्रकरणांत तारण ठेवलेले सोने फेरतपासणीत पूर्णपणे खोटे असल्याचे निष्पन्न झाल्याने बँक प्रशासनात खळबळ उडाली आहे.

या प्रकरणी संबंधित कर्जदार आणि तत्कालीन गोल्ड व्हॅल्युएटर अजित प्रभाकर कुलकर्णी यांच्याविरुद्ध फसवणुकीची तक्रार दाखल करण्यात आली आहे. याप्रकरणी बँकेची तब्बल ९१ लाखांची फसणूक झाली आहे. गोल्ड व्हॅल्युअर कुलकर्णी मोबाइल बंद ठेऊन, कार्यालयाला व घराला कुलूप लावून पळून गेला आहे.

पोलिसांनी सांगितले की, कल्याण जनता सहकारी बँकेचे उप व्यवस्थापक निलेश देशमुख (५०, रा.अमनोरा टॉवर) यांनी आर्थिक गुन्हे शाखेकडे तक्रार दाखल केली होती, त्यानूसार वारजे माळवाडी पोलीस ठाण्यात व्हॅल्यूअरसह तब्बल ४२ जणांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला आहे. ही फसवणूक २६ ऑक्टोबर २०२० ते ३० जून २०२१ या कालावधीत वारजे आणि बिबवेवाडी शाखांमध्ये झाली आहे.

येथून एकूण ४१ ग्राहकांनी सोनेतारण कर्ज घेतले होते. बँकेच्या नोंदीनुसार सर्व ग्राहकांनी बचत खाती उघडून आवश्यक कागदपत्रे सादर केली होती. गोल्ड व्हॅल्युएटर अजित कुलकर्णी यांनी दागिन्यांची शुद्धता व वजन तपासून प्रमाणपत्र दिले होते.

त्यावर विश्वास ठेवून बँकेने वार्षिक ८.५ टक्के व्याजदराने कर्ज मंजूर केले. एकूण ९१ लाख रुपये कर्ज वितरित करण्यात आले. प्रारंभी काही महिन्यांपर्यंत कर्जदारांनी व्याजाची रक्कम भरली. मात्र, त्यानंतर परतफेड थांबली. परिणामी सर्व खाती अनुत्पादक कर्ज घोषित करण्यात आली. कर्जदारांशी संपर्क साधूनही प्रतिसाद न मिळाल्याने आणि गोल्ड व्हॅल्युएटरचा मोबाइल बंद असल्याने बँकेला संशय आला. संबंधित व्हॅल्युएटर त्यांच्या निवासस्थानी व कार्यालयात उपलब्ध नसल्याचेही स्पष्ट झाले.

दरम्यान ६ व ७ ऑगस्ट २०२५ रोजी बँकेने नव्याने नियुक्त गोल्ड व्हॅल्युएटर विवेक एकनाथ डहाळे (प्रथमेश ज्वेलर्स) यांच्या उपस्थितीत वरिष्ठ अधिकाऱ्यांसह आणि पंचांसमक्ष सर्व सिलबंद पाकिटांची सीसीटीव्ही रेकॉर्डिंगसह फेरतपासणी केली असता तारण ठेवलेले सर्व दागिने बनावट होते. त्यांची बाजारमूल्य शून्य असल्याचा अहवाल सादर करण्यात आला.

# दोन वर्षांच्या चिमुकल्यासमोर बापाची गळफास घेऊन आत्महत्या; कारण अस्पष्ट

**लोणी काळभोर, ता. २० :** दोन वर्षाच्या चिमुकल्यासमोरच वडिलांनी राहत्या घराची कडी आतमधून बंद करून आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. ही घटना लोणी काळभोर (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील माळी मळा परिसरात असलेल्या महात्मा फुले नगर परिसरात घडली असून, शुक्रवारी (ता.२०) सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली आहे. ही घटना त्याच्या दोन वर्षांच्या चिमुकल्या मुलासमोरच घडल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.



धर्मराज तीरीन चंद्राकार (वय अंदाजे ३५, मूळ रा. छत्तीसगड) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. ते कुटुंबासह लोणी काळभोर येथे वास्तव्यास होते. मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवारी सकाळी त्यांच्या पत्नी घरातील किराणा सामान आणण्यासाठी बाहेर गेल्या होत्या. त्यावेळी घरात धर्मराज आणि त्यांचा दोन वर्षांचा मुलगा असे दोघेच होते. याच दरम्यान धर्मराज यांनी घराची कडी आतून बंद केली. काही वेळानंतर पत्नी परत आल्यानंतर त्यांनी दरवाजा ठोठावला, आवाज दिला; मात्र आतून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. संशय आल्याने शेजाऱ्यांना बोलावण्यात आले. परिस्थिती गंभीर असल्याची जाणीव होताच तात्काळ लोणी काळभोर पोलिसांना कळविण्यात आले.

या घटनेची माहिती मिळताच लोणी काळभोर पोलीस ठाणे येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक अंकुश बोराटे, बीट मार्शल अंकुश घुले, निखील मेमाणे, रुपाली कदम, निकिता पोळ व इतर कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. नागरिकांच्या मदतीने दरवाजा फोडण्यात आला. त्यावेळी घरातील मोरीजवळ छताच्या अँगलला गमछ्याच्या सहाय्याने गळफास घेऊन लटकलेल्या अवस्थेत धर्मराज चंद्राकार आढळून आले.

पोलिसांनी तातडीने त्यांना खाली उतरवून उपचारासाठी लोणी काळभोर येथील विश्वराज हॉस्पिटल येथे दाखल केले; मात्र तेथील डॉक्टरांनी तपासणीअंती उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे घोषित केले. लोणी काळभोर पोलिसांनी धर्मराज चंद्राकार यांचा मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदन करण्यासाठी पुण्यातील रुग्णालयात पाठविला आहे. शवविच्छेदनाचा अहवाल आल्यानंतर मृत्यूचे खरे कारण समजेल. परंतु, धर्मराज चंद्राकार यांनी एवढे टोकाचे पाऊल का उचलले? त्यादृष्टीने पुढील तपास लोणी काळभोर पोलीस करत आहेत.

**दोन वर्षांचा चिमुकला घरात अन् आईचा बाहेरून**

या घटनेतील सर्वात वेदनादायी बाब म्हणजे, दोन वर्षांचा चिमुकला मुलगा घरातच होता. आई दरवाजा ठोठावत असताना तो आतून बोलत होता; मात्र कडी उघडण्यास असमर्थ होता. वडिलांना वाचवू न शकलेला तो निष्पाप चेहरा पाहून उपस्थितांचे डोळे पाणावले. लोणी काळभोर परिसरात या घटनेने शोककळा पसरली असून नागरिकांमधून हळहळ व्यक्त केली जात आहे.

# मुलीची हत्या करून प्रेत गादीत बांधलं; विल्हेवाट लावताना आई–वडील जेरबंद

**छत्रपती संभाजीनगर, ता. २०** : एखाद्या सस्पेन्स थ्रिलर सिनेमात शोभावं असं थरारक आणि तितकीच धक्कादायक घटनावाळूज परिसरातून समोर आली आहे. गस्तीवर असलेल्या पोलिसांनी एका रिक्षाची तपासणी केली आणि जे दृश्य समोर दिसलं, ते पाहून सगळेच थक्क झाले. रिक्षामध्ये घरगुती सामानाच्या आड, एका गादीत चक्क २० वर्षीय तरुणीचा मृतदेह गुंडाळून नेला जात होता.



वाळूज पोलिसांचे पथक तिसगाव चौफुली भागात नेहमीप्रमाणे गस्तीवर होते. एका रिक्षामध्ये गादी आणि संसारोपयोगी साहित्य भरलेलं पाहून पोलिसांनी ती रिक्षा थांबवली. रिक्षवाला आणि सोबत असलेल्यांच्या चेहऱ्यावरील भीती पाहून पोलिसांचा संशय बळावला. त्यांनी झडती घेतली आणि पोलिसांना तरुणीचा मृतदेह दिसून आला. पोलिसांनी तातडीने तरुणीच्या पालकांना ताब्यात घेतलं.

प्राथमिक चौकशीत तरुणीच्या सावत्र आईने हा आत्महत्येचा प्रकार असल्याचं सांगितलं. मुलीचे प्रेमसंबंध होते, त्यातून तिने गळफास घेतला. समाजात बदनामी होईल या भीतीने आम्ही कोणालाही न सांगता अंत्यसंस्कारासाठी मृतदेह गावी घेऊन जात होतो, अशी कबुली तिने दिली. मात्र, एका तरुण मुलीने आत्महत्या केल्यावर पोलिसांना कळवण्याऐवजी तिचा मृतदेह सामानासारखा गुंडाळून नेणं, ही बाब पोलिसांना पचनी पडली नाही. त्यामुळे पोलीस आता या प्रकरणाची कसून चौकशी करत आहेत.

# ‘पुणे शहराचा पाणीपुरवठा बंद करणार, जलसंपदा विभागाचा महापालिकेला इशारा’

## सुप्रिया सुळेंचे थेट मुख्यमंत्र्यांना पत्र

**पुणे, ता. २०** : पुणे शहराच्या पाणीपुरवठ्यावरून महापालिका आणि जलसंपदा विभाग यांच्यातील वाद आता उघडपणे समोर आला आहे. खडकवासला धरणातून पुण्याला पाणीपुरवठा केला जातो; मात्र यावर्षी मंजूर मर्यादेपेक्षा अधिक पाणी वापरल्याचा ठपका ठेवत जलसंपदा विभागाने महापालिकेवर दंड आकारला आहे. थकबाकी तातडीने न भरल्यास पाणीपुरवठा खंडित करण्याचा इशाराही देण्यात आला आहे. वाढत्या उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर हा इशारा शहरासाठी गंभीर ठरू शकतो.



या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)च्या खासदार सुप्रिया सुळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे. शासनाचे दोन विभाग परस्परविरोधी भूमिका घेत असतील तर त्याचा फटका थेट नागरिकांना बसतो, अशी त्यांची भूमिका आहे. पाणी हा मूलभूत हक्क असून, प्रशासकीय मतभेदांमुळे शहराला पाण्यापासून वंचित ठेवणे योग्य नाही, असे त्या म्हणाल्या.

पुण्याची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. नव्याने समाविष्ट झालेली गावे, वाढती बांधकामे आणि औद्योगिक मागणी यामुळे पाण्याची गरजही वाढली आहे. मात्र जलसाठ्याचे नियोजन, गळती नियंत्रण आणि पुनर्वापर याकडे पुरेसे लक्ष गेले नाही, अशी टीका होत आहे. त्यामुळे मर्यादेपेक्षा जास्त वापर का झाला, त्याची जबाबदारी कोणाची आणि दंड आकारणे हा एकमेव उपाय आहे का, हे प्रश्न उपस्थित होत आहेत.

सुळे यांनी महापालिका आयुक्तांची भेट घेऊन पाणी, कचरा व्यवस्थापन, वाहतूक कोंडी आणि प्रदूषण यांसारख्या प्रश्नांवरही चर्चा केली. समाविष्ट गावांवरील मिळकत कराच्या वसुलीला स्थगिती मिळाली असली तरी दीर्घकालीन तोडगा आवश्यक आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. वडगावमधील शाळा आणि नाट्यगृह प्रकल्प दहा वर्षांपासून रखडल्याची बाबही त्यांनी मांडली. प्रकल्प लांबले की खर्च वाढतो आणि नागरिकांची गैरसोयही वाढते, याकडे त्यांनी लक्ष वेधले.

पाण्याचा प्रश्न केवळ आर्थिक थकबाकीपुरता मर्यादित नाही; तो शहराच्या भविष्यातील शाश्वत नियोजनाशी निगडित आहे. राज्य सरकारने समन्वय साधून तातडीचा आणि दीर्घकालीन तोडगा काढणे ही काळाची गरज आहे.

# भिगवण अपहरण प्रकरणाला वेगळे वळण; मध्यरात्री तरुणी बारामती पोलीस ठाण्यात हजर

**भिगवण, ता. २०** : इंदापूर तालुक्यातील भिगवण येथील ज्या कथित अपहरण प्रकरणामुळे संपूर्ण पुणे जिल्हा हादरला होता, त्या प्रकरणाचा शेवट एखाद्या फिल्मी क्लायमॅक्सप्रमाणे झाला आहे. भरदिवसा आई-भावाच्या डोळ्यांत मिरचीपूड टाकून मुलीला पळवून नेल्याचा दावा करणाऱ्या तक्रारीत आता मोठी तफावत आढळली असून, संबंधित तरुणी गुरुवारी मध्यरात्री स्वतःहून बारामती शहर पोलीस ठाण्यात हजर होत जबाब नोंदवला आहे.



मंगळवारी दुपारी ४ च्या सुमारास ही २१ वर्षीय तरुणी लग्नाचे दागिने खरेदी करून घरी परतत होती. त्यावेळी जहीर शेख आणि आयान शेख या दोन भावांनी तिला टेम्पोतून पळवून नेल्याची तक्रार तिच्या कुटुंबीयांनी दिली होती. तक्रारीत म्हटले होते की, आरोपींनी आई-भावाला मारहाण केली आणि त्यांच्या डोळ्यांत मिरचीपूड फेकली. या घटनेनंतर पोलिसांनी तातडीने चौकशी सुरु केली.

गुरुवारी मध्यरात्री दीडच्या सुमारास तरुणी प्रियकरासह बारामती पोलीस ठाण्यात दाखल झाली आणि तिने दिलेला जबाब धक्कादायक आहे. तरुणीच्या म्हणण्यानुसार स्वतःच्या मर्जीने आणि नियोजित प्लॅननुसार घरून निघून गेली होती. तक्रारीत केलेला मिरचीपुडीचा दावा खोटा असून, मेडिकल रिपोर्टमध्येही डोळ्यात चटणी टाकल्याचे कोणतेही अंश आढळलेले नाहीत. तिने भावाच्या मोबाईलवरूनच प्रियकराला शासकीय विश्रामगृहाजवळ बोलावले आणि तिथून ती त्याच्यासोबत निघून गेली. पळून गेल्यानंतर हे जोडपे श्रीगोंदा, अहिल्यानगर, शिक्रापूर, पुणे, सासवडमार्गे महाबळेश्वरला गेले होते. तिथून थेट पोलीस ठाणे गाठले. सध्या तरुणी बारामती पोलिसांच्या ताब्यात असून, मुलाला पोलिसांनी पहाटे खासगी गाडीतून अज्ञात स्थळी नेले आहे. धक्कादायक बाब म्हणजे, मुलीच्याघरच्यांनीतिलास्वीकारण्यास किंवा पोलीस ठाण्यात येण्यास नकार दिल्याची प्राथमिक माहिती आहे. दरम्यान, पोलिस काय कारवाई करत आहेत? याबद्दल कमालीची गुप्तता ठेवण्यात आली आहे.

# कॉलेजला निघालेल्या अल्पवयीन तरुणीचे भर रस्त्यातून अपहरण; तिघांना अटक

## घनदाट जंगलात डांबून ५ दिवस लैंगिक अत्याचार

**अहिल्यानगर, ता. २०** : अहिल्यानगरमधील राहुरी तालुक्यात एक अल्पवयीन मुलीचे अपहरण करुन तिच्यावर घनदाट जंगलात पाच दिवस डांबून अत्याचार करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. पोलिसांनी या प्रकरणी तीन आरोपींना अटक केली आहे. पुढील तपास सुरु आह. या घटनेने जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार राहुरीतील १५ वर्षांची मुलगी सकाळी कॉलेजला जाते म्हणून घराबाहेर पडली. मात्र ती संध्याकाळपर्यंत घरी परतली नाही, त्यामुळे पालकांची चिंता वाढली. त्यांनी शोधाशोध केली पण ती आढळून न आल्याने राहुरी पोलिसांत तक्रार दाखल केली. पोलिसांनी अपहरणाचा गुन्हा नोंदवला आणि तपास सुरु केला. मुलीच्या शोधासाठी एक पथकही नेमले. पोलिसांनी तांत्रिक बाबींच्या आधारे परिसरातील सीसीटीव्ही फुटेज. मोबाईल लोकेशन ट्रॅकिग, आणि गोपनीय माहितीच्या आधारे तपास सुरु केला असता मुलीचे लोकेशन नाशिक-सुरत महामार्गालगतच्या रामशेज किल्ल्याजवळ असल्याचे आढळून आले. पोलिस किल्ल्याजवळील घनदाट जंगलात पोहोचले मुलीची सुटका केली.

पाच दिवस शोध घेतल्यानंतर पोलिसांनी मुलीची सुटका केली तेव्हा समोर आलेले सत्य धक्कादायक होते. निर्जन जंगलात तिला डांबून ठेवून तिच्यावर बलात्कार करण्यात आला. याप्रकरणी पोलिसांनी मुक्तार हैदर पठाण (मुख्य आरोपी), कौसर हैदर पठाण आणि आकाश शरद संसारे या तिघांना बेड्या ठोकल्या असून आरोपींवर पॉक्सो कायदा आणि भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान, पोलिस याप्रकरणी अधिक तपास करत आहेत.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

# मुंढवा जमीन घोटाळ्यात तहसीलदार येवले आणि निबंधक तारू बडतर्फ

## खारगे समितीचा अहवाल येताच राज्य सरकारचा दणका

**पुणे, ता. २० :** मुंढवा येथील बहुचर्चित सरकारी जमीन गैरव्यवहार प्रकरणात मोठी प्रशासकीय कारवाई करण्यात आली असून निलंबित पुणे शहर तहसीलदार सूर्यकांत येवले आणि नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागातील सहदुय्यम निबंधक रवींद्र तारू यांना राज्यघटनेच्या कलम ३११ अंतर्गत बडतर्फ करण्याची शिफारस राज्य सरकारने नेमलेल्या खारगे समितीने केली आहे. महसूल विभागातील अधिकाऱ्यांवर अशा प्रकारची थेट बडतर्फीची कारवाई क्वचितच होत असल्याने प्रशासनात मोठी खळबळ उडाली आहे.

मुंढवा येथील बॉटनिकल सर्व्हे ऑफ इंडियाच्या मालकीची सुमारे ४० एकर जमीन तब्बल ३०० कोटी रुपयांना विक्री करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला होता. या व्यवहारात पार्थ पवार भागीदार असलेल्या अमेडिया एंटरप्रायझेस या कंपनीचे भागीदार दिग्विजयसिंह पाटील आणि कुलमुखत्यारधारक शीतल तेजवानी यांच्यात व्यवहार झाल्याचे समोर आले. मात्र, या व्यवहाराच्या दस्तनोंदणी प्रक्रियेदरम्यान अनेक नियमांना बगल देण्यात आल्याचे प्राथमिक चौकशीत स्पष्ट झाले.





या प्रकरणाच्या चौकशीसाठी राज्य सरकारने महसूल विभागाचे अतिरिक्त सचिव विकास खारगे यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली होती. समितीने संबंधित कागदपत्रांची पडताळणी करून सविस्तर अहवाल सरकारकडे सादर केला असल्याचे समजते. या अहवालात सूर्यकांत येवले आणि रवींद्र तारू यांनी गंभीर स्वरूपाच्या त्रुटी केल्याचे नमूद करण्यात आल्याची माहिती सूत्रांकडून मिळते.

दरम्यान, अहवाल अंतिम सादर होण्यापूर्वीच राज्य सरकारने कलम ३११ चा विशेषाधिकार वापरत दोन्ही अधिकाऱ्यांना बडतर्फीची नोटीस बजावली होती. राज्यघटनेच्या कलम ३११ नुसार, अत्यंत गंभीर स्वरूपाच्या प्रकरणात विभागीय चौकशी न करताही शासकीय कर्मचाऱ्याला सेवेतून कमी करण्याचा अधिकार सरकारला आहे. जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात सूर्यकांत येवले यांना ही नोटीस देण्यात आली होती. त्यांनी या निर्णयाला महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण (मॅट) मध्ये आव्हान दिले.

१३ जानेवारी रोजी झालेल्या सुनावणीत येवले यांच्या वकिलांनी विभागीय चौकशी न करता नोटीस देणे अन्यायकारक असल्याचा युक्तिवाद केला. मात्र, कलम ३११ अंतर्गत सरकारला चौकशीविना कारवाई करण्याचा अधिकार असल्याचे नमूद करत मॅटने याचिका निकाली काढली. त्यामुळे येवले यांच्या बडतर्फीचा मार्ग मोकळा झाला आहे. त्याचप्रमाणे दस्तनोंदणी प्रक्रिया पार पाडणारे सहदुय्यम निबंधक रवींद्र तारू यांनाही बडतर्फीची नोटीस देण्यात आली आहे. महसूल प्रशासनात या कारवाईमुळे मोठी खळबळ माजली असून, भविष्यात जमीन व्यवहारांमध्ये नियमांचे काटेकोर पालन करण्याचा इशारा या निर्णयातून देण्यात आल्याचे बोलले जात आहे. सरकारी जमिनींच्या व्यवहारात पारदर्शकता आणि जबाबदारी सुनिश्चित करण्यासाठी सरकार कठोर भूमिका घेत असल्याचे या प्रकरणातून स्पष्ट झाले आहे.

प्राईम लाईफ



## उन्हाळ्याचा 'या' गोष्टींकडे करू नका दुर्लक्ष; जाणून घ्या अधिक माहिती

**पुणे, ता. २० :** राज्याच्या अनेक भागांत तापमानाचा पारा ४० अंशांच्या पार गेला आहे. कडक उन्हामुळे केवळ घामच येत नाही, तर शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होऊन थकवा, चक्कर येणे आणि उष्माघाताचा धोका वाढतो. अशा वेळी औषधांपेक्षा 'आहार' हेच मोठे संरक्षण कवच ठरू शकते. आरोग्य तज्ज्ञांच्या मते, उन्हाळ्यात आपण काय खातो यापेक्षा काय टाळतो, याला जास्त महत्त्व आहे. केवळ तहान लागल्यावर पाणी पिणे ही मोठी चूक आहे. उन्हाळ्यात शरीराला सतत गरज असते.

लिंबू सरबत आणि पन्हे : केवळ साधे पाणी न पिता त्यात लिंबू, मीठ आणि थोडी साखर घालून प्यावे, जेणेकरून शरीरातील इलेक्ट्रोलाईट्स टिकून राहतील.

नारळ पाणी : हे नैसर्गिकरित्या शरीरातील उष्णता शोषून घेते.

पालेभाज्या आणि फळांचा राजा 'कलिंगड' : उन्हाळ्यात पचनशक्ती मंदावते, त्यामुळे जड अन्न खाणे टाळावे.

पाणीदार फळे : कलिंगड, टरबूज, संत्री आणि द्राक्षे यामध्ये ९० टक्केपेक्षा जास्त पाणी असते. ही फळे नैसर्गिक थंडावा देतात.

काकडी : रोजच्या जेवणात काकडीचा समावेश हमखास करावा. काकडी शरीर हायड्रेटेड ठेवण्यासोबतच त्वचाही टवटवीत ठेवते.

दही आणि ताक : जेवणात दह्याची कोशिंबीर किंवा जेवणानंतर एक ग्लास ताक म्हणजे उन्हाळ्यातील अमृतच. ताकामध्ये प्रोबायोटिक्स असतात, जे पचन सुधारतात आणि शरीरातील अतिरिक्त उष्णता बाहेर काढण्यास मदत करतात.

हे पदार्थ तातडीने टाळा : तळलेले आणि मसालेदार पदार्थ : जास्त तेलकट आणि तिखट पदार्थ खाल्ल्याने शरीरातील उष्णता वाढते आणि पित्ताचा त्रास होतो.

चहा आणि कॉफी : कॅफीनमुळे लघवीला जास्त वेळ जावं लागत, ज्यामुळे शरीर लवकर डिहायड्रेट होते. त्याऐवजी थंड दूध किंवा आमसूल सरबत उत्तम.

मांसाहार कमी करा : उन्हाळ्यात मांस पचायला जड जाते आणि त्यामुळे शरीराचे तापमान वाढू शकते.

दरम्यान, हे सोपे आणि महत्वाचे बदल तुम्ही केल्यास तुम्ही उन्हाळ्यातही निरोगी रहाल. उष्माघाताचा त्रास होत असल्यास डॉक्टरांना दाखवावे. घरीच उपचार करू नये.

# अमृता फडणवीस यांचा ॲक्सिस बँकेतील वरिष्ठ उपाध्यक्षपदाचा राजीनामा

**मुंबई, ता. १९ :** मुंबईतून एक महत्त्वाची घडामोड समोर आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांनी बँकिंग क्षेत्रातील तब्बल २३ वर्षांच्या सेवेनंतर ॲक्सिस बँकेतील आपल्या वरिष्ठ उपाध्यक्षपदाचा राजीनामा दिला आहे. त्यांनी ही माहिती सोशल मीडियावरील भावनिक पोस्टद्वारे जाहीर केली. व्यवस्थापन प्रशिक्षणार्थी म्हणून सुरू झालेला त्यांचा प्रवास वरिष्ठ उपाध्यक्ष या पदापर्यंत पोहोचला होता. या काळात त्यांनी शाखा संचालन, कॉर्पोरेट बँकिंग, ट्रेझरी आणि ग्राहक संबंध यांसारख्या महत्त्वाच्या विभागांमध्ये जबाबदाऱ्या सांभाळल्या.



अमृता फडणवीस यांनी आपल्या संदेशात ॲक्सिस बँक ही केवळ नोकरी नसून कुटुंबासारखी संस्था असल्याची भावना व्यक्त केली. दीर्घ कारकिर्दीत सहकार्य केलेल्या सहकाऱ्यांचे आणि वरिष्ठांचे त्यांनी आभार मानले. विशेषतः बँकेचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी अमिताभ चौधरी यांच्या मार्गदर्शनाचा उल्लेख त्यांनी कृतज्ञतेने केला. या प्रवासात व्यावसायिक कौशल्यासोबत वैयक्तिक समृद्धीही मिळाल्याचे त्यांनी नमूद केले.

राजकीयदृष्ट्या महत्त्वाच्या व्यक्तीच्या पत्नी असूनही अमृता फडणवीस यांनी स्वतःची स्वतंत्र व्यावसायिक ओळख निर्माण केली होती. गेल्या काही वर्षांत त्या सामाजिक उपक्रम, महिला सक्षमीकरण, पर्यावरणविषयक मोहिमा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांत सक्रिय राहिल्या आहेत. गायिका म्हणूनही त्यांनी काही गाणी सादर केली आहेत. राजकीय आणि सामाजिक विषयांवर त्या स्पष्ट मत मांडत असल्याने त्या अनेकदा चर्चेत राहिल्या.

त्यांच्या राजीनाम्यामागील नेमके कारण अधिकृतपणे जाहीर झालेले नसले तरी सार्वजनिक जीवनातील वाढती व्यस्तता, सामाजिक काम काज किंवा नव्या उपक्रमांची शक्यता याबाबत तर्कवितर्क सुरू आहेत. बँकिंग क्षेत्रातील दीर्घ अनुभव आणि सार्वजनिक ओळख लक्षात घेता, पुढील काळात त्या कोणत्या नव्या भूमिकेत दिसतील, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## शेतकऱ्याकडून लाच घेताना तहसिलदाराला रंगेहाथ पकडलं

**बीड, ता. २० :** बीड जिल्ह्यात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने मोठी कारवाई करत परळी येथील तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांना शेतकऱ्याकडून लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडले. या कारवाईमुळे परळी तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदार शेतकऱ्याकडून सोलंसी (ऐपतीचे) प्रमाणपत्र देण्यासाठी २० हजार रुपयांची मागणी करण्यात आल्याची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कडे करण्यात आली होती. सुरुवातीला ५० हजार रुपयांची मागणी करण्यात आल्याची माहिती असून तडजोडीनंतर २० हजारांवर सौदा ठरल्याचे समोर आले आहे. तक्रारीची पडताळणी केल्यानंतर एसीबी पथकाने सापळा रचला. उपअधीक्षक सोपान चिट्टमपल्ले यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. काही वेळापूर्वी तहसीलदारांना लाच स्वीकारताना ताब्यात घेण्यात आले.

दरम्यान, तक्रारदाराच्या हालचालींवर संशय आल्याने तहसीलदारांनी पैसे स्वीकारण्यास टाळाटाळ केल्याचेही सांगण्यात येत आहे. तरीही एसीबीने आवश्यक पुरावे गोळा करत पुढील कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू केली आहे.

या घटनेमुळे परळी तालुक्यातील महसूल विभागात एकच खळबळ उडाली असून संबंधित अधिकाऱ्याविरोधात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. भ्रष्टाचाराविरोधातील या कारवाईमुळे नागरिकांकडून समाधान व्यक्त करण्यात येत असून प्रशासनात पारदर्शकता राखण्यासाठी अशा कठोर पावले आवश्यक असल्याची भावना व्यक्त होत आहे.

## ७/१२ उताऱ्यात होणार मोठा बदल; राज्य सरकारचा ऐतिहासिक निर्णय

पुणे, ता. २० : राज्यातील ज्या शेतजमिनीवर एकापेक्षा जास्त खातेदार (सहिस्सेदार) आहेत, अशा सामाईक खात्यांमधील प्रत्येक शेतकऱ्याच्या नावावर त्याच्या हिश्याची जमीन स्वतंत्रपणे नमूद करण्यासाठी राज्य सरकारने महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ कलम ८५ नुसार विशेष मोहीम राबवण्याचे आदेश दिले आहेत. या निर्णयामुळे सातबारा उताऱ्यावरील प्रत्येक खातेदार अथवा शेतकऱ्यांच्या नावासमोर क्षेत्र नमूद केले जाणार आहे.राज्यात तयार करण्यात आलेले शेतकरी ओळख क्रमांक म्हणजे फार्मर आयडी कृषी विभागाच्या सर्व योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी वापरणे आवश्यक आहे. शेतकरी ओळख क्रमांक तयार होण्यासाठी जमिनीचे अचुक क्षेत्र नोंद असणे आवश्यक आहे.

तथापी सातबारा उताऱ्यावर सामाईक खात्यामध्ये एकूण क्षेत्र हे एका खातेदाराच्या नावासमोर नमूद केले जाते. परंतु, शेतकरी फार्मर आयडी निर्माण करताना सर्व खातेदारांच्या नावासमोर त्या खात्यातील एकूण क्षेत्र नमूद केले जाते. यामुळे फार्मर आयडी तयार करताना तांत्रिक अडचणी येत आहेत. कृषी विभागाच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी आणि पीक पाहणी, जमीन खरेदी-विक्री किंवा फेरफार नोंद करताना होणारा गोंधळ टाळण्यासाठी प्रत्येक हिस्सेदाराचे क्षेत्र त्याच्या नावापुढे असणे आवश्यक आहे, यापार्श्वभूमीवर हा महत्त्वपूर्ण निर्णय महसूल विभाग घेतला असून त्याचा शासन निर्णय सहसचिव संजय बनकर यांनी जारी केला आहे.

**मोहिमेचे स्वरूप आणि कार्यपद्धती..**

- खाते विभाजनासाठी तालुका, मंडळ स्तरावर शिबिर
- हिस्सेदारांना विहित नमुन्यात अर्ज करावा लागणार
- खाते विभाजनाची प्रक्रिया सुलभ करण्याच्या सूचना
- मोहिमेत अधिकाधिक शेतकऱ्यांच्या सहभागाचे उद्दिष्ट

**शेतकऱ्यांना काय होणार फायदा..**

- प्रत्येक शेतकऱ्याला हिश्यानुसार स्वतंत्र ओळख क्रमांक
- कृषी विभागाच्या सर्व योजनांचा लाभ थेट मिळणार
- खरेदी-विक्री करताना तांत्रिक अडचणी दूर होतील
- ई-पीक पाहणीत स्वतःच्या हिश्शाच्या जमिनीची अचूक नोंद

## झेडपीत ५ तर पंचायत समितीत २ स्वीकृत सदस्य नेमा; आमदार शंकर मांडेकरांची मागणी

**पुणे, ता. १९ :** ग्रामीण भागातील निष्ठावंत आणि तळागाळात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये प्रतिनिधित्व मिळावे, यासाठी भोरमुळशीराजगडचे आमदार शंकर मांडेकर यांनी राज्य सरकारकडे महत्त्वाची मागणी केली आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियमात सुधारणा करून जिल्हा परिषदेत आणि पंचायत समितीत स्वीकृत सदस्य नेमण्याची तरतूद करावी, असे त्यांनी सुचवले आहे. या प्रस्तावामुळे ग्रामीण राजकारणात सक्रिय असलेल्या कार्यकर्त्यांमध्ये आशेचे वातावरण निर्माण झाले आहे.



अनेक वेळा सामाजिक उपक्रम, आपत्ती व्यवस्थापन, पक्ष संघटन आणि विकासकामांत मोलाचे योगदान देणारे कार्यकर्ते निवडणूक प्रक्रियेतून बाहेर राहतात. त्यामुळे त्यांच्या अनुभवाचा आणि अभ्यासाचा उपयोग निर्णय प्रक्रियेत होत नाही. ही दरी भरून काढण्यासाठी स्वीकृत सदस्यांची तरतूद आवश्यक असल्याचे मांडेकर यांचे म्हणणे आहे. त्यांनी या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना पत्र पाठवून मागणी मांडली आहे. संबंधित विभागाकडेही त्यांनी पाठपुरावा सुरू केल्याचे सांगितले जाते.

ही सुधारणा झाल्यास स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बैठकीत अनुभवी आणि क्षेत्राशी निगडित जाण असलेले व्यक्ती सहभागी होतील. यामुळे विकास आराखड्यांवर अधिक सखोल चर्चा होऊन निधीचा योग्य वापर, पारदर्शकता आणि गती वाढू शकते. तसेच, राजकीय निष्ठा जपणाऱ्या कार्यकर्त्यांमध्ये शासनाविषयीचा विश्वास अधिक दृढ होईल, असा दावा मांडेकर यांनी केला आहे.

आता राज्य सरकार या मागणीवर सकारात्मक निर्णय घेते का, आणि कायद्यात बदल करण्याची प्रक्रिया कितपत वेगाने पुढे सरकते, याकडे ग्रामीण भागातील राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

## चितळीत माजी सैनिकाचा भररस्त्यात तलवार व कुऱ्हाडीने सपासप वार करून निर्घृण खून

**वडूज, ता. २० :** खटाव तालुक्यातील चितळी येथे बुधवारी (ता. १८) सायंकाळी माजी सैनिकाची भररस्त्यात तलवार व कुऱ्हाडीने सपासप वार करून निर्घृण हत्या करण्यात आली. या थरारक घटनेने संपूर्ण परिसर हादरला असून गावात तणावपूर्ण शांतता पसरली आहे. रणजित मदन निकम (वय ३८)असे खून झालेल्या माजी सैनिकाचे नाव आहे.

या प्रकरणी वडूज पोलिसांनी पृथ्वीराज संभाजी पवार आणि पवन संतोष पवार यांना अटक केली आहे. संतोष महादेव पवार याला ताब्यात घेण्यात आले असून एक अल्पवयीन युवकही पोलिसांच्या ताब्यात आहे. भारत शशिकांत पवार हा संशयित अद्याप फरार असून त्याचा शोध सुरू आहे.

मृत रणजित निकम हे चार वर्षांपूर्वी सैन्यदलातून निवृत्त झाले होते. ते गावी शेती व्यवसाय करत होते. सुमारे चार महिन्यांपूर्वी त्यांचा आरोपी पृथ्वीराज पवार याच्याशी वाद झाला होता. त्या घटनेनंतर दोन्ही बाजूंनी तक्रारी दाखल झाल्या होत्या. त्याच वादातून हा सूड उगवल्याची चर्चा गावात रंगली आहे. बुधवारी सायंकाळी सातच्या सुमारास निकम दुचाकीवरून गावातील तालीम परिसरात गेले असता संशयितांनी त्यांच्यावर अचानक हल्ला चढवला. प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार, पृथ्वीराज व पवन पवार यांनी तलवारीने, तर भारत पवार याने कुऱ्हाडीने डोके, पाठ, हात-पाय व पोटावर वार केले. गंभीर जखमी झालेल्या निकम रक्ताच्या थारोळ्यात कोसळले.

हल्ल्यावेळी संतोष पवार व अल्पवयीन युवकाने हातातील कोयता दाखवत जमलेल्या नागरिकांना जवळ येऊ नका अशी धमकी दिली. त्यामुळे काही काळ परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले. आरोपी त्यानंतर पसार झाले. ग्रामस्थांनी निकम यांना तातडीने मायणी येथील रुग्णालयात दाखल केले; मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या प्रकरणी निकम यांचे बंधू यांनी दिलेल्या फिर्यादीवरून खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घटनेची माहिती मिळताच पोलिस निरीक्षक घनश्याम सोनवणे पथकासह घटनास्थळी दाखल झाले. सहायक निरीक्षक विक्रांत पाटील तपास करत आहेत. दरम्यान, संतोष पवार याला अळसन (ता. खानापूर, जि. सांगली) येथून ताब्यात घेण्यात आले. खून प्रकरणानंतर चितळी गावात पोलिस छावणीचे स्वरूप आले असून कडक बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

## पाटस टोल नाक्याजवळ चहाचा गाडा लावण्यावरून दोन गटात तुंबळ हाणामारी

**यवत, ता. २० :** पाटस टोलनाका परिसरात चहाची टपरी लावण्यावरून ६ ते ७ जणांनी एका १८ वर्षीय तरुणाला व त्याच्या कुटुंबियांना कोयता व काठीने बेदम मारहाण केल्याची घटना घटना घडली आहे. याप्रकरणी ३ महिलांसह ९ जणांवर यवत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हि घटना बुधवारी (ता. १८) सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास पुणे -सोलापूर महामार्गावरील पाटस टोल नाका परिसरात घडली.

ओंकार दिपक भोसले (वय १८, व्यवसाय- शेती रा. अंबिकानगर, पाटस, ता.दौड) असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी ओंकार भोसले यांनी यवत पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार शिवम देवराम भोसले, चेतन देवराम भोसले, पारूबाई देवराम भोसले, सोनाली देवराम भोसले, राजु भोसले, सारीका जगन्नाथ पवार, अविनाश जगन्नाथ पवार, जगन्नाथ पवार, दाद्या दत्तात्रय खंडाळे, सर्व रा. पाटस अंबिकानगर, ता. दौंड) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर फिर्यादी भोसले यांची आई अलका भोसले, लक्ष्मी पवार, महादेव पवार अशी जखमी झालेल्या तिघांची नावे आहेत.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पुणे -सोलापूर महामार्गावरील पाटस टोल नाका परिसरात फिर्यादी ओंकार भोसले बुधवारी सायंकाळी चहाचा गाडा लावत होते. यावेळी त्या ठिकाणी आरोपी पारूबाई भोसले आल्या व ओंकार भोसले यांना म्हणाल्या की, या ठिकाणी चहाचा गाडा लावायचा नाही या ठिकाणी आम्ही आधी चहाचा गाडा लावायचो. यावेळी दोघांमध्ये बाचाबाची झाली.

यावेळी वरील आरोपी यांनी बेकायदा जमाव जमवुन शिवम भोसले याने त्याचे हातातील कोयता ओंकार याच्या डोक्यात मारला. त्यामुळे ओंकार जखमी झाला. यावेळी फिर्यादी याची आई अलका भोसले, लक्ष्मी पवार, महादेव पवार यांनाही कोयत्याने डोक्यात, कपाळावर मारून आपखुशिने दुखापत केली असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

दरम्यान, फिर्यादी ओंकार भोसले याच्यासह कुटुंबियांना लाकडी काठीने मारून आपखुशिने दुखापत केली तसेच हाताने लाथा बुक्याने मारहान करून शिवीगाळ दमदाटी केल्याप्रकरणी तीन महिलांसह ९ जणांवर भारतीय न्याय संहितेच्या कलम ११०, ३१८(१), १८९(२), १९०, १९१(२), १९१(३), ११५(२), ३५२, ३५१(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक गाडेकर करीत आहेत.

# पुण्यात सुपारी देऊन आखलेला खुनाचा कट पोलिसांनी उधळला; शार्प शूटरला अटक

**पुणे, ता. २० :** सूड उगवण्याच्या उद्देशाने आखण्यात आलेला संभाव्य खुनाचा कट पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेच्या खंडणीविरोधी पथकाने वेळेत उधळून लावला आहे. शार्प शुटरला सुपारी देऊन गावठी पिस्तुल उपलब्ध करून देण्यात आल्याची गोपनीय माहिती मिळताच पोलिसांनी तत्काळ कारवाई करत एका आरोपीला अटक केली असून इतरांविरुद्ध गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

चेतन ऊर्फ बाळ्या सिद्धनाथ जाधव (वय २६, रा. दांडेकर पुल) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याच्यासह सिंधु ऊर्फ आक्का धोत्रे, सिन्नु झरेकर, पिंकी रेणुसे, गणेश रेणुसे, अमन झरेकर (सर्व रा. महालक्ष्मी बिल्डिंग, सिंहगड रोड, दत्तवाडी), सुमित माने (रा. हडपसर), निशांत राऊत (रा. अप्पर बिबवेवाडी) आणि बापू कांबळे (रा. अप्पर बिबवेवाडी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, ऑक्टोबर २०२४ मध्ये संतोष ऊर्फ भावड्या साळुंखे याच्यावर धारदार शस्त्राने हल्ला करण्यात आला होता. या प्रकरणी पर्वती पोलीस ठाण्यात खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्यातील आरोपींवर मोक्का अंतर्गत कारवाई करण्यात आली होती. त्यापैकी गणेश रेणुसे हा सध्या जामिनावर बाहेर असल्याचे समोर आले आहे.

तपासात उघड झालेल्या माहितीनुसार, संतोष साळुंखे हा सूड उगवण्यासाठी गणेश रेणुसेवर हल्ला करू शकतो, अशी भीती रेणुसेच्या नातेवाईकांना वाटत होती. त्यामुळे आधीच त्याचा काटा काढण्याचा कट रचण्यात आला. यासाठी गावठी पिस्तुल खरेदी करून ते चेतन जाधव याच्याकडे सुपूर्द करण्यात आले. काम पूर्ण झाल्यानंतर ठरावीक रक्कम देण्याचेही ठरले होते, अशी कबुली चेतन जाधवने चौकशीदरम्यान दिल्याची माहिती पोलिसांनी दिली.

दरम्यान, गुन्हे शाखेच्या खंडणीविरोधी पथकातील पोलीस उपनिरीक्षक रामेश्वर पार्वे आणि त्यांच्या पथकाला बातमीदारामार्फत या कटाची माहिती मिळाली. त्यानुसार दांडेकर पुल परिसरात सापळा रचण्यात आला. मांगीरबाबा चौक येथे संशयित हालचाली करत असताना चेतन जाधव याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून शस्त्रसाठा आणि इतर पुरावे जप्त करण्यात आल्याची माहिती आहे. ही संपूर्ण कारवाई अपर पोलीस आयुक्त पंकज देशमुख, पोलीस उपायुक्त निखील पिंगळे, सहायक पोलीस आयुक्त शंकर खटके यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजीत काइंगडे आणि त्यांच्या पथकाने पार पाडली. पोलिसांच्या या तत्पर कारवाईमुळे एक संभाव्य खून टळला असून शहरात मोठी गुन्हेगारी घटना घडण्यापासून रोखण्यात यश आले आहे. पुढील तपास सुरू आहे.